वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- रविवार दि.२६ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

# डॉ.संपदाच्या हातावरील हस्ताक्षर तिचे नव्हेच

## डॉक्टरांच्या कुटूंबियांची भेट घेतल्यानंतर आ.धनंजय मुंडेंचे स्पष्टीकरण

Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com



### होय, त्या खासदाराच्या पीएचे डॉक्टरांना फोन, दबाव टाकला

बीड, (दिव्य न्युज):- माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे यांनी फलटणमधील मृत डॉक्टरच्या कुटुंबियांची बीडच्या घरी जाऊन भेट घेतली. कुटुंबियांचे सांत्वन करून या प्रकरणात न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करेन, अशी ग्वाही त्यांनी दिली. महिला डॉक्टरच्या मृत्यू प्रकरणात माजी खासदारांवर



आणि त्यांच्या स्वीय सहाय्यकांवर होत असलेले कथित आरोप खरे असल्याचा पुरावाच धनंजय मुंडे यांनी माध्यमांना दाखवला. तसेच महिला डॉक्टर मृत्यू प्रकरणातील तपासी अधिकाऱ्यांचे फोन रेकॉर्डची चौकशी करा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

गरकळ नावाचे मुकादम आहेत, ज्यांचे ट्रॅक्टर माजी खासदारांच्या कारखान्यावर आहेत. त्यांची काही बाकी शिल्लक होती. यावरून काहीसा वाद झाल्याने गरकळ यांना जबर मारहाण करण्यात आली. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांना काहीही झाले नाही, ते पूर्णपणे तंदुरुस्त (फिट) आहेत, यासाठी मृत महिला डॉक्टरवर दबाव टाकण्यात आला. खासदारांच्या स्वीय सहाय्यकाने महिला डॉक्टरला अनेक वेळा फोन केले, असे सांगत संबंधित गरकळ नावाच्या मुकादमांना धनंजय मुंडे यांनी माध्यमांसमोर आणले. त्यांनीही आपल्यासमोर हे प्रकार घडल्याचे माध्यमांना सांगितले.महिला डॉक्टरच्या मृत्यू प्रकरणात ▶▶ पान २ वर




आ.धनंजय मुंडेंनी मुकादम गरकळ यांना मिडीयासमोर बोलावून दिले स्पष्टीकरण

# प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे पत्रकाराच्या आत्मदहन इशाऱ्याची स्थिती गंभीर!

### तहसीलदार मॅडम यांच्या बेकायदेशीर कारवाईवर अंभोरा पोलिसांकडून अद्याप कोणतीही कार्यवाही नाही!

दौलावडगाव, (दिव्य न्युज):- पत्रकार कासम शेख यांच्या राहत्या घरावर तहसीलदार वैशाली मॅडम यांनी कुठलीही पूर्वसूचना, नोटीस वा कायदेशीर प्रक्रिया न करता प्रशासनाच्या बळाचा गैरवापर करून अंभोरा पोलिसांच्या संरक्षणाखाली बुलडोजर चालविल्याप्रकरणी तहसीलदार वैशाली मॅडम, दौलावडगाव सजा तलाठी मॅडम,अंभोरा पोलीस स्टेशनचे पी आय चंद्रकांत तावरे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल शिरसाट व इतर संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र या प्रकरणात अंभोरा पोलिसांनी सखोल चौकशीसाठी कालावधी मागवला होता, तो कालावधी आता संपत आला असतानाही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

या विलंबामुळे संबंधित पत्रकार कासम शेख यांनी प्रशासनाविरुद्ध तीव्र नाराजी व्यक्त केली असून, जर दोषींवर गुन्हे दाखल झाले नाहीत तर मी कुटुंबासह आत्मदहनाचा निर्णय घेणार असा इशारा त्यांनी दिला आहे. या इशाऱ्यामुळे संपूर्ण परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थ व स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनीही या घटनेची दखल घेऊन तहसीलदारांच्या या कारवाईचा निषेध नोंदविला ▶▶ पान २ वर



# दामिनी पथकाची कॉफी शॉपवर धडक कारवाई

### ११ जणांवर प्रतिबंधात्मक गुन्हे

बीड, (दिव्य न्युज):- दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दामिनी पथकाने शहरातील कॉफी शॉप्सवर तपास मोहीम राबवून गैरप्रकारांना आळा घालण्याची कारवाई सुरू केली आहे. आज दुपारी बीड शहरासह गेवराई परिसरात पेट्रोलिंग दरम्यान विविध कॉफी शॉप्सची तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान गैरवर्तन करत असलेल्या ११ तरुणांवर गेवराई पोलीस ठाण्यात मुंबई पोलीस अधिनियम कलम ११० व ११७ अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.



पोलीस खात्याच्या आकडेवारीनुसार, जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत जिल्ह्यातील विविध कॉफी शॉप्सवर अशा स्वरूपाच्या एकूण ८४ कारवाया करण्यात आल्या आहेत. तसेच शाळा, कॉलेज, क्लासेस आणि हॉस्टेलच्या बाहेर उभे राहून मुलींना त्रास देणाऱ्या रोडरोमियोंवरही या कलमान्वये प्रतिबंधात्मक गुन्हे दाखल ▶▶ पान २ वर

# कोल्हेवाडीत भांडण आठ जणांवर गुन्हा

केज, (दिव्य न्युज):- कोल्हेवाडी (ता. केज) येथील सदाशिव भगवान आंधळे हे २४ ऑक्टोबर रोजी रात्री आठ वाजता पत्नी व मुलासह जेवण करीत असताना त्यांच्या भावकीतील गोरख उर्फ विकास अशोक आंधळे हा दारुच्या नशेत घरासमोर येऊन शिव्या देऊ लागला. ते बाहेर आले असता गोरख याने तुम्ही लग्न मोडले असे म्हणत तलवारीने त्यांच्या हातावर वार करीत जखमी केले. त्यांची पत्नी व मुलगा भांडण सोडविण्यास आले असता त्यांना ही लाथाबुक्याने मारहाण केली. अशी तक्रार सदाशिव आंधळे यांनी दिल्यावरून गोरख उर्फ विकास आंधळे याच्याविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

दुसऱ्या गटाच्या पार्वती अशोक आंधळे यांच्या तक्रारीनुसार २४ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजता त्या घरी एकट्याच असताना विष्णु सदाशिव आंधळे याने येऊन दार वाजविले. त्यांनी घरी कोणी नसल्याचे सांगितल्यावर विष्णू हा तेथून निघून गेला. त्यांचा मुलगा गोरख उर्फ विकास आंधळे हा ▶▶ पान २ वर

# महिला डॉक्टर हॉटेलवर का गेली?

### मध्यरात्री दीड वाजता 'चेक इन', २ दिवसाचं बूकिंग; दुसऱ्या दिवशी मृतदेह आढळला

बीड, (दिव्य न्युज):- फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी आतापर्यंत दोघांना अटक करण्यात आली आहे. महिला डॉक्टरने एका हॉटेलमध्ये गळफास घेत मृत्यूला कवटाळलं होतं. ती हॉटेलवर का गेली? कधी गेली? याबाबत आता नवे अपडेट्स समोर आले आहेत. महिला डॉक्टरने आत्महत्ये आधी हातावर पीएसआय गोपाल बदने आणि घरमालकाचा मुलगा प्रशांत बनकर यांची नावे लिहीत गंभीर आरोप केले होते. आत्महत्या केली त्या रात्री तरुणी फ्लॅटकडे गेली होती पण तिथं कुलुप लावलेलं असल्यानं हॉटेलवर जाण्याचा निर्णय घेतला होता अशी माहिती सूत्रांनी दिलीय.



महिला डॉक्टर ही प्रशांत बनकर यांच्या मालकीच्या घरात वरच्या मजल्यावर राहत होती. पण आत्महत्या केली त्या दिवशी तिच्या फ्लॅटला कुलूप लावण्यात आलं होतं. आरोपी प्रशांत बनकर आणि महिला डॉक्टर यांच्यात वाद झाला होता. यानंतर तू तं रहायचं नाही आणि यायचंही नाही असं प्रशांतने तिला सांगितलं होतं. त्यामुळे ऐनवेळी कुठे रहायचं असा प्रश्न महिला डॉक्टरसमोर होता.परिसरातच असलेल्या लॉजवर राहण्याचा निर्णय़ महिला डॉक्टरनं घेतला. तेव्हा तिने पीएसआय गोपाल बदने आणि प्रशांत बनकर यांना अनेक कॉल केले होते अशीही माहिती समोर येतेय. गेल्या ८ महिन्यांपासून ती प्रशांत बनकरच्या घरात भाडेकरू म्हणून वास्तव्यास होती अशीही ▶▶ पान २ वर

# प्रभाग क्रमांक १७ साठी एक सक्षम, प्रामाणिक आणि लोकाभिमुख नेतृत्व - मोहम्मद असरार अब्दुल खदिर

### राष्ट्रवादी अजित पवार पक्षाकडून ओबीसीसाठी उमेदवारी निश्चित

बीड, (दिव्य न्युज):- नगरपालिकेच्या निवडणुकीची चाहूल लागताच प्रभाग क्रमांक १७ अजीज पुरा,कट कट पुरा,खंदक,छोटी खंदक,कागदी वेस,किला मैदान,जूनी तहशील,गिराम गल्ली,तेरवी लाइन,धांडे गल्ली,राजूरी वेस, मध्ये राजकीय चर्चा रंगात आली आहे. अनेक इच्छुक उमेदवार मैदानात उतरण्याची तयारी करत असताना, या प्रभागात एक नाव जनतेच्या मनात ठामपणे उमटत आहे -



मोहम्मद असरार हे अचानक उदयास आलेले नाव नाही. ते वर्षानुवर्षे जनतेमध्ये राहून, त्यांच्या समस्या ऐकून आणि त्यावर तोडगा काढत आले आहेत. त्यांचा जनसंपर्क हा केवळ निवडणुकीपुरता नाही, तर तो जीवनपद्धतीचा भाग आहे.रस्ते, नाले, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, रोजगार या सर्व विषयांवर असरार यांनी प्रत्यक्ष काम करून नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे.

#### युवकांसाठी प्रेरणा, शिक्षणासाठी धडपड

युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून ▶▶ पान २ वर



# मोमीनपुरा येथील तरुणाचा नवगनराजुरीत मृतदेह आढळला

बीड, (दिव्य न्युज):- शहरातील मोमीनपुरा भागातील तरुण नवगनराजुरी येथे गेला होता. रात्री त्याचा पुलावर मृतदेह आढळला असल्याने खळबळ उडाली असून, नातेवाईकांनी याबाबत घातपाताचा संशय व्यक्त करीत चौकशीची मागणी केली आहे. शेख इरफान निजामुद्दीन (वय ३६ वर्ष) रा. मोमीनपुरा बायपास रोड, बीड असे मयत तरुणाचे नाव आहे. इरफान काल राजुरी येथे आपल्या भावाकडे भांडण मिटवण्यासाठी गेला होता. या बैठकीत दोन्ही गटात वाद झाला पण तो जागीच मिटवून घेण्यात आला. पण शनिवारी दि. २५ रात्री ८ वाजण्याच्या सुमारास राजुरी येथील नदीवरील बंधाऱ्यात शेख इरफान पडलेला मिळून आला. त्यास तातडीने बीड येथे जिल्हा रुग्णालयात पान २ वर



# देशभरात २२ बोगस विद्यापीठं

### महाराष्ट्रातलं कोणतं? युजीसीने जाहीर केली यादी

**मुंबई, (दिव्य न्युज):-देशभरात उच्च शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या बनावट विद्यापीठांचा पर्दाफाश झाला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) या फसव्या विद्यापीठांवर कारवाईचा बडगा उगारत त्यांची नावे जाहीर केली आहेत. देशभरातील अशा तब्बल २२ विद्यापीठांचा या यादीत समावेश असून, त्यापैकी दिल्लीतील १०, उत्तर प्रदेशातील ४, तर महाराष्ट्रातील एका विद्यापीठाचा समावेश आहे.**

विद्यार्थ्यांची दिशाभूल होऊ नये म्हणून यूजीसी दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात अशा बोगस विद्यापीठांची यादी प्रसिद्ध करते. यंदा जाहीर झालेल्या यादीत काही विद्यापीठांवर आधीच चार वेळा कारवाईचे निर्देश देण्यात आले होते, तरीदेखील राज्य सरकारांकडून ठोस हालचाल झालेली नाही. त्यामुळे आयोगाने नाराजी व्यक्त करत राज्य सरकारांना कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत.

दिल्ली आणि उत्तर प्रदेश या दोन राज्यांमध्ये सर्वाधिक बनावट विद्यापीठे आढळली आहेत, असे यूजीसीच्या संकेतस्थळावरून जाहीर झालेल्या यादीनुसार स्पष्ट झाले आहे. दिल्लीतील बोगस विद्यापीठांमध्ये ए.आय.पी.एच.एस. विद्यापीठ, कमर्शियल युनिव्हर्सिटी लिमिटेड, युनायटेड नेशन्स युनिव्हर्सिटी, व्होकेशनल युनिव्हर्सिटी, ए.डी.आर. सेंट्रीक ज्युरीडीकल विद्यापीठ, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड इंजिनिअरिंग, विश्वकर्मा ओपन युनिव्हर्सिटी फॉर सेल्फ एम्प्लॉयमेंट, आध्यात्मिक विद्यापीठ, डब्ल्यूपीयूएन विद्यापीठ आणि ▶▶ पान २ वर

# चकलांबा येथील मुस्लिम समाजाने भगवानबाबा गो शाळेला शेड दिले दान

## गो शाळेचे अध्यक्ष भाऊसाहेब थोरे यांनी मानले मुस्लिम समाजाचे आभार

चकलांबा, (दिव्य न्युज):- चकलांबा येथील भगवानबाबा गो शाळा येथे ८० ते १०० जनावरे आहेत.यंदाच्या पावसाळयात जनावरांचे पावसामुळे खूप हाल झाले ते हाल बघता मुस्लिम समाजाने गो शाळेचे अध्यक्ष भाऊसाहेब थोरे यांना म्हटले तुम्ही गाईसाठी निवारा का करत नाही ते म्हणाले,त्याला खूप मोठा खर्च आहे. मग तो शेडला लागणारा खर्च मुस्लिम समाजाने पुढाकार घेऊन मुस्लिम समाजात वर्गणी करून ३०बाय १०० चे शेड गो शाळेसाठी दान दिले.शेडचे काम पूर्ण झाल्यावर भगवान बाबा गो शाळेचे अध्यक्ष भाऊसाहेब थोरे यांनी मुस्लिम समाजाचे धर्मगुरू यांच्या हस्ते गो शाळेचे उद्घाटन ठेवून हिंदू-मुस्लिम ऐकतेचे प्रतीक म्हणून गो शाळेत दि. २६ ऑक्टोबर २०२५ रविवार रोजीसकाळी ११वाजता कार्यक्रम ठेवला.या कार्यक्रमाला उपस्थित मुस्लिम धर्मगुरू हजरत सय्यद महेबुब कादरी,बालाजी महाराज शास्त्री (श्रीराम संस्थान तिंतरवणी), सोनाली दिदी करपे व ईश्वर चैतन्य महाराज करपे(कल्याण स्वामी संस्थान चकलांबा), डॉ.सुदाम महाराज शास्त्री (भगवानगड संस्थान, पैठण), संतोष महाराज खेडकर (भगवानगड), एकनाथ महाराज गाढे(चकलांबा), मा. शिवप्रसाद खेडकर (कार्यकारी अभियंता), आण्णासाहेब राठोड (राष्ट्रवादी शरद पवार तालुका अध्यक्ष गेवराई), मा. सुरेश भाऊ जाजू(मा.सरपंच), मा.भीमराव कुलाळ (मा.उपसरपंच), दयानंद पांडुळे (रसुलाबाद माजी सरपंच), युवा नेते चेतन पाटील खेडकर, मा. आदिनाथ खेडकर, मा. अशोक खेडकर, मा.देवराव नागरे (सामाजिक कार्यकर्ते) रहीम भाई (दादेगाव) जब्बार शेख,फारूख भाई, पापाभाई, मा.श्रीधर जाधव ग्रामपंचायत सदस्य कुंडलिक गुंजाळ पत्रकार असलम कादरी, शेख सलमान, सय्यद गफ्फार तसेच सर्व गावकरी उपस्थित होते. वरील सर्वांचे संत भगवानबाबा गो शाळेचे अध्यक्ष भाऊसाहेब थोरे यांनी आभार मानले.



# 'त्या' चिमुकलीची ओळख पटविणाऱ्यास रोख बक्षीस

## नाव गुपीत ठेवण्यात येईल, पाच हजार बक्षीस

बीड (दिव्य न्युज):- बिंदुसरा नदीपात्रात काल अंदाजे तीन महिन्यांच्या बालिकेचा मृतदेह आढळला आहे. त्याची अद्याप ओळख पटलेली नसल्याने ओळख पटविण्याचे पोलीस दलाने आवाहन केले आहे. तसेच ओळख पटविणाऱ्यास रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. माहिती देण्यासाठी पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ ७५८८८ ०७७७, पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे ८६६८८९५३४८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन केले. शहरातील खासबाग जवळ बिंदुसरा नदी पात्रात काल शनिवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास स्त्री जातीचे पाण्यात बुडालेल्या अवस्थेत मृतदेह आढळला आहे. या बालकिचे वय अंदाजे ३ महीने असून उंची १.५ फूट असुन रंग गोरा आहे. अंगावर गुलाबी रंगाचा फ्रॉक, जाभळ्या रंगाची टोपी, दोन्ही हातात काळ्या दोऱ्यात बांधलेल्या मनगट्या, दोन्ही पायात तांब्याच्या धातुच्या वाळ्या आहेत. या बालिकेची अद्याप ओळख पटलेली नाही. बालक आपल्या आजुबाजूच्या परीसरात मिसींग अथवा मयत झाला असल्यास व त्यांची माहिती मुद्दामहून लपवली असल्याचा संशय असल्यास याची माहिती देणाऱ्यास रोख रक्कम ५ हजार रुपये बक्षिस देण्यात येईल व त्यांचे नाव व मोबाईल नंबर गुप्त ठेवला जाईल. असे पोलीस दालाकडून जाहीर करण्यात आले. याची माहिती असेल तर वरील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# अंत्यसंस्कारासाठी पाण्यातून मृतदेह नेण्याची वेळ; ग्रामस्थांचा संताप

शिरूर, (दिव्य न्युज):- मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते.. कवी सुरेश भटांच्या कवितेच्या या ओळीची आठवण आर्वी गावात घडलेल्या दुःखद घटनेनं समोर आली... आर्वी गावात घडलेली घटना मात्र जिवंत माणसाच्या हृदयाला चिरणारी आहे. मृत्यूनंतरही मृतदेहाला शांती नाही, तर अंत्यसंस्कारा साठीसुद्धा तारेवरची कसरत करावी लागतेय.शिरूर तालुक्यातील आर्वी गावातील महादेव नन्नवरे यांचे शुक्रवारी रात्री दुःखद निधन झाले. पण त्यांच्या अंत्यविधीला गेलेली गावभरची मंडळी मात्र जणू एखाद्या आपत्तीशी झुंज देत होती. गाव उथळा नदीच्या एका तिरावर आणि स्मशानभूमी दुसऱ्या तिरावर असल्याने, मृतदेह खांद्यावर घेऊन मांडीइतक्या पाण्यातून नदी पार करत गावकऱ्यांनी मृतदेह स्मशानभूमीत नेला. या दृश्याने प्रत्येक गावकऱ्याच्या मनात वेदनेचा आणि संतापाचा स्फोट झाला.

नदीतून वाहणाऱ्या पाण्यात दगड-खड्डे असताना, मृतदेह खांद्यावर घेऊन चालणाऱ्या लोकांची अवस्था बघवणारी नव्हती. एखादा खांदेकरी घसरला असता तर अंत्ययात्रा शोकांतिकेतच परिवर्तीत झाली असती, अशी भीती प्रत्येकाला वाटत होती. तरीही गावकऱ्यांनी जीव मुठीत धरून नदी पार केली. चिखल, प्रवाह आणि असहायता या सर्वांवर मात करून त्यांनी अंत्यविधी पार पाडला. पण हे आर्वीकरांसाठी नवे नाही दरवर्षी अशाच कसरतीला तोंड द्यावे लागते, हे त्यांचे कटू वास्तव आहे.



# गेवराई मतदारसंघात राजकीय भूकंप!

## माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा भाजपमध्ये प्रवेश

बीड, (दिव्य न्युज):- गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित यांनी अखेर भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत.

माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित यांचा हा महत्त्वपूर्ण प्रवेश सोहळा रविवारी (दि.२६ ऑक्टोबर) रोजी परळी येथे पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी भाजप नेते बाळराजे पवार यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समर्थक उपस्थित होते.भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर बदामराव आबा पंडित यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली गेवराईत विकासाचे नवे पर्व सुरू झाले आहे. त्यांच्या कार्यशैलीने प्रेरित होऊन मी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. आगामी निवडणुकांमध्ये आम्ही बाळराजे पवार यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून लढणार आहोत.

### राजकीय समीकरणांना वेग

बदामराव पंडित यांच्या या प्रवेशामुळे गेवराई मतदारसंघात भाजपची ताकद लक्षणीयरीत्या वाढल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. यामुळे गेवराई आणि परिसरातील राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ सुरू झाली असून, भाजपच्या संघटनात्मक बळाला मोठे पाठबळ मिळाल्याचे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे.

### आबांच्या प्रवेशाने शिवसेनेला खिंडार

गेवराई तालुक्यात लोकनेते म्हणून ओळख असलेल्या बदामराव 'आबा' यांना मानणारा मोठा वर्ग आहे. आबांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने जिल्ह्यात भाजपची ताकद आणखी वाढणार आहे. विशेष म्हणजे, बदामराव पंडित यांच्या या प्रवेशामुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला मोठे खिंडार पडले आहे.

पान १ वरून

## डॉ.संपदाच्या हातावरील

यांचे नाहीच, असे त्यांच्या बहिणीचे म्हणणे आहे. एक बहीण दुसऱ्या बहिणीचे हस्ताक्षर अतिशय चांगल्यापणाने ओळखू शकते असे सांगत यासंदर्भात तक्रार देण्यासाठी कुटुंबीय ज्यावेळी साताऱ्याला गेले, त्यावेळी तिथे अनेक तास त्यांना बसवून ठेवण्यात आले, असा आरोप धनंजय मुंडे यांनी केला.

महिला डॉक्टरच्या मृत्यू प्रकरणाचा तपास जे पोलीस अधिकारी करीत आहेत किंबहुना ज्यांनी आत्महत्येनंतर तपास केला या सगळ्या पोलीस अधिकाऱ्यांचे फोन रेकॉर्ड काढण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी केली. खासदाराच्या दोन पीएचा संबंध जोडला गेला आहे, त्यांचीही चौकशी झाली पाहिजे, असेही धनंजय मुंडे म्हणाले. महिला डॉक्टरच्या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मी आता शासनाला स्वस्थ बसू देणार नाही, असेही ते म्हणाले.वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून हा प्रकार घडलेला आहे. कुटुंबातला एकही व्यक्ती मानायला तयार नाही की या महिला डॉक्टरने आत्महत्या केली आहे म्हणून, घरच्यांना असं वाटत आहे की ही आत्महत्या घडवून आणली गेली आहे, त्याची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी धनंजय मुंडे यांनी केली आहे. या घटनेसंदर्भात मी मुख्यमंत्र्यांना सांगितलेलं आहे, या प्रकरणात एसआयटी नेमावी, आणि या एसआयटीमध्ये सिनियर महिला आयपीएस अधिकारी नियुक्त कराव्यात असंही यावेळी मुंडे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान पुढे बोलताना मुंडे म्हणाले की, मृत महिला डॉक्टरच्या बहिणीचं म्हणणं आहे की, हे हस्ताक्षर तिचं नाहीच आहे. त्यामुळे पोलिसांनी या सर्व प्रकरणाची चौकशी केली पाहिजे, सर्वांचे सीडीआर काढले पाहिजेत, सरळ-सरळ खासदारांच्या दोन पीएंचा यामध्ये संबंध जोडला गेला, आहे असंही यावेळी धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.दरम्यान या प्रकरणात आरोपी असलेल्या प्रशांत बनकर याला पोलिसांनी आधीच अटक केली होती, तर दुसरा आरोपी निलंबित पीएसआय गोपाळ बदने हा देखील पोलीस ठाण्यात हजर झाला, त्याला पोलिसांनी अटक केली आहे.

## दामिनी पथकाची

करण्यात आले असून, अशा एकूण १६८ कारवाया आजपर्यंत झाल्या आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पीएसआय पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर, पोलीस हवालदार शोभा जाधव, पोलीस हवालदार अशोक शिंदे आणि पोलीस शिपाई उर्मिला म्हस्के (दामिनी पथक, बीड) यांनी सहभाग घेतला.पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन करणाऱ्या किंवा महिलांना त्रास देणाऱ्या घटकांविरोधात तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, जेणेकरून अशा वर्तनावर कडक कारवाई करता येईल.

## प्रशासनाच्या

आहे.पत्रकारावर अन्याय होतोय आणि प्रशासन मात्र मौन बाळगते आहे, हा लोकशाहीवरील विश्वास लोकशाही वरील विस्वास संपत चालला आहे,अशी टीका सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर घोडके यांनी केली आहे.

प्रशासनाकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नसून, दोषींवर गुन्हे दाखल करण्यासंबंधीची मागणी कायम आहे.या प्रकरणात पारदर्शक चौकशी करून दोषींवर कडक कारवाई व्हावी, अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.जर अशीच निष्क्रियता कायम राहिली तर आगामी काळात प्रशासनाविरुद्ध मोठे आंदोलन पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## महिला डॉक्टर

माहिती समोर येत आहे.

प्रशांत बनकर याच्याशी वादानंतर महिला डॉक्टर २३ तारखेला मध्यरात्री दीडच्या सुमारास हॉटेल मधुदीप इथं गेली. तिने मध्यरात्री चेक इन करत २ दिवसांसाठी रूम बूक केली. हॉटेलमध्ये जाताना तिच्यासोबत कुणीही नव्हतं.दरम्यान, महिला डॉक्टर, पीएसआय बदने आणि प्रशांत बनकर यांच्यात कॉल झाले. दिवसभर तिने दरवाजा न उघडल्यानं हॉटेल व्यवस्थापनाने सायंकाळी चार वाजता दरवाजा उघडला. तेव्हा डॉक्टर तरुणीने आत्महत्या केल्याचं उघडकीस आलं.आरोपी प्रशांत बनकर याला पुण्यातून अटक केल्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं. बनकरला ७ दिवसांची पोलीस कोठडी द्यावी अशी मागणी पोलिसांनी केली होती. पण न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. तर पीएसआय गोपाल बदने हा शनिवारी रात्री ११ च्या सुमारास पोलिसांसमोर हजर झाला. त्याला आज कोर्टात हजर करण्यात येणार आहे.

## कोल्हेवाडीत भांडण

घरी आल्यावर त्याला हा प्रकार सांगितला. तो विष्णूच्या घरी विचारणा करण्यास गेला असता विष्णु आंधळे, सदाशिव आंधळे, समाबाई आंधळे, केसर मिसाळ, मुंजा मिसाळ, राजेभाऊ मिसाळ, भाऊसाहेब आंधळे यांनी त्याला लाथाबुक्क्यांनी व चापटांनी मारहाण केली. त्यानंतर पार्वती यांना घरी येऊन शिवीगाळ केली. अशी तक्रार दिल्यावरून वरील सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास फौजदार उमेश निकम करीत आहेत.

## देशभरात २२

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड इंजिनिअरिंग या दहा विद्यापीठांचा समावेश आहे, जे यूजीसीच्या मान्यतेशिवाय कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशात गांधी हिंदी विद्यापीठ, महामाया टेक्निकल युनिव्हर्सिटी, नेताजी सुभाषचंद्र बोस मुक्त विद्यापीठ आणि भारतीय शिक्षा परिषद ही चार विद्यापीठे देखील या यादीत समाविष्ट आहेत.

यादीत इतर राज्यातील विद्यापीठांमध्ये केरळमधील सेंट जॉन युनिव्हर्सिटी, इंटरनॅशनल इस्लामिक विद्यापीठ, पश्चिम बंगालमधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह मेडिसिन आणि इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह मेडिसिन अँड रिसर्च, आंध्र प्रदेशातील क्राइस्ट न्यू टेस्टामेंट ओपन युनिव्हर्सिटी, डीम्ड युनिव्हर्सिटी, बायबल युनिव्हर्सिटी, तसेच पुदुच्चेरीतील श्री बोधी अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातही नागपूरमधील राजा विद्यापीठ हे विद्यापीठ मान्यता नसतानाही कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

यूजीसी कायदा, १९५६ नुसार कोणत्याही शैक्षणिक संस्थेला 'विद्यापीठ' हा दर्जा फक्त आयोगाकडून मिळू शकतो. या कायद्याच्या कलम २२(१) नुसार केंद्र, राज्य आणि प्रांतातील शैक्षणिक संस्थांना विद्यापीठाचा दर्जा दिला जातो. तर कलम २३ अंतर्गत विनापरवानगी 'विद्यापीठ' हा शब्द वापरणे गुन्हा आहे. तरीही काही संस्था हा नियम पाळत नाहीत आणि विद्यार्थ्यांना फसवून पदव्या देत आहेत, असे आयोगाने नमूद केले आहे.

## प्रभाग क्रमांक १७ साठी

देणे, शिक्षणविषयक मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे, सरकारी योजनांचा लाभ खऱ्या पात्रांपर्यंत पोहोचवणे – हे त्यांच्या कामाचे ठळक वैशिष्ट्य आहे. त्यांचा ठाम विश्वास आहे की प्रभागाचा विकास म्हणजे प्रत्येक घरात समाधान आणि प्रत्येक तरुणाच्या चेहऱ्यावर हसू.

राजकीय आणि सामाजिक वारसा

मोहम्मद असरार यांना ही जनसेवेची प्रेरणा आणि समाजभावना वारशात मिळालेली आहे. त्यांचे आजोबा, मरहूम अब्दुल रज्जाक सेठ, हे बीड शहरात इंडियन नॅशनल काँग्रेस (इंदिरा गांधी) पक्षाचे संस्थापकांपैकी एक होते.त्यांनी आयुष्यभर सामाजिक, शैक्षणिक आणि लोककल्याणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम केले.त्याच परंपरेचा वारसा असरार यांनी पुढे नेला असून, ते सर्व धर्म, सर्व समाज यांना जोडणारे एक समन्वयशील नेतृत्व म्हणून उभे राहिले आहेत.

## मोमीनपुरा येथील

आणण्यात आले. परंतु यावेळीडॉक्टरांनी तपासून मृत्यू झाल्याचे घोषित केले. पण याप्रकरणी नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. जिल्हा रुग्णालयात नातेवाईकांनी मोठी गर्दी केली आहे. यामुळे हा प्रकार नेमका काय? शेख इरफान यांचा मृत्यू कशाने झाला हे शवविच्छेदनातून निष्पन्न होईल.